**<u>नि.४७ वरील आदेशानुसार उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.डी.नाईक यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>**

९. मी डिप्लोमा इंजिनिअर असून मी शेती करतो . हे म्हणणे खरे नाही की मी व्याजावर पैसे देण्याचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की ज्या गावातील जमिनीमधील आंब्यांचा करार करण्यात आला ती जमीन कोणत्या गावातील आहे हे माझ्या फिर्यादीमध्ये , नोटीसीमध्ये व सरतपासामध्ये नमूद नाही. (साक्षीदाराला खटल्याचा अभिलेख दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की माझ्या फिर्यादीमध्ये, नोटीसीमध्ये व सरतपासामध्ये गावाचे नाव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की मौजे भेंडमळा जमीन सर्वे नंबर ४२ व ५३ यांचे हिस्सा नंबर माझ्या फिर्यादीमध्ये, नोटीसीमध्ये व सरतपासामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की करार ज्या जमिनीबाबत झाला त्याच्याशी माझा कोणताही संबंध नसल्याने तसा करार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्याशी कोणताही करार केलेला नाही . हे म्हणणे खरे नाही की मी हजर केलेल्या करारावर आरोपीची सही नाही . (साक्षीदाराला दि.२०/०२/२०१५ रोजीचा करार दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की सदर करारामध्ये देखील जमीन कोणत्या गावातील आहे हे नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सर्व व्यवहार लेखी करतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की मी सदर केसमध्ये कराराचा व्यवहार लेखी केला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्याशी कोणताही लेखी अथवा तोंडी व्यवहार केलेला नसल्याने आरोपी माझे देणे लागत नाही . हे म्हणणे खरे नाही की आरोपीने करारापोटी त्याची सही करुन मला चेक दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सदरचा चेक हा माझ्या बॅकेत टाकला व बॅकेने दि. २९/०६/२०२० रोजीचा रिटर्न मेमो

मला मिळाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला  नोटीस पाठविली व ती मुदतीत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या केसला मुदतीची बाधा येते. हे म्हणणे खरे नाही की मुदतीच्या बाहेर जावून मी प्रस्तुत केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की जो करार मी अभिलेखावर दाखल केला आहे त्याचा बॉण्डपेपर मी माझ्या नावे घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की करारासाठी जे मी साक्षीदार वापरले ते खोटे साक्षीदार असून त्यांच्या सह्या खोट्या आहेत व त्यांचा आरोपींशी कोणताही संबंध नाही . माझ्या म्हणण्यानुसार मी अभिलेखावर दाखल केलेल्या कराराव्यतिरिक्त इतर कोणताही लेखी करार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की जमीन नेमकी  कोठे आहे हे सिध्द होत नसल्याने आरोपीने माझ्याशी कोणताही करार केलेला नाही .  हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्याकडून रक्कम रुपये ५०,०००/– घेतले व सिक्युरिटी म्हणून चेक दिला होता त्यावर रक्कम रुपये ३,८०,०००/– अशी रक्कम टाकून त्या चेकचा गैरवापर करुन सदरची खोटी केस आरोपीविरुध्द दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा माझे कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दाखल केलेला करार हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी केस दाखल केलेली असून आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/–

दिनांक– १५/०७/२०२३.

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी  वर्ग १, वेंगुर्ला.